दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ९४ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१ फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क


# राज्यपाल होऊन मी काय करू?: राज्यपाल होणे म्हणजे तोंडाला टाळे ठोकणे-छगन भुजबळ

## मी असा मोकळाच बरा; संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना हाल-हाल करून मारा

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मी राज्यपाल होऊन काय करू? राज्यपाल होणे म्हणजे तोंडाला टाळे ठोकणे. त्यापेक्षा मी मोकळाच बरा, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे भुजबळांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्यापुढे राज्यसभेच्या सदस्यत्वासह राज्यपालपदी संधी देण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.छगन भुजबळ सध्या राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी अनेकदा उघडपणे बोलून दाखवली आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देण्याचेही संकेत दिलेत. त्यामुळे त्यांची मनधरणी करण्यासाठी महायुतीकडून जोरकसपणे प्रयत्न केले जात आहेत.

यासाठी महायुतीने त्यांच्यापुढे राज्यसभेचे सदस्यत्व किंवा राज्यपालपद स्वीकारण्याचा प्रस्ताव ठेवल्याचीही चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळ यांनी शुक्रवारी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपरोक्त विधान केले आहे.छगन भुजबळ म्हणाले की, मला राज्यपाल करणे म्हणजे माझ्या तोंडाला टाळे ठोकणे. मी राज्यपाल होऊन काय करू? माझे काम गोरगरिबांच्या अडअडचणी सोडवण्याचे आहे. त्यांच्यासाठी भांडण करण्याचे आहे. राज्यपाल होऊन मी त्या समस्या किंवा अडीअडचणी सोडवू शकणार आहे का? माझी राज्यपालपदाचा अपमान करण्याची इच्छा नाही. पण मी असा मोकळाच ठीक आहे.लोकसभा निवडणुकीवेळी पक्षश्रेष्ठींकडून मला नाशिक येथून तयार करण्यास सांगण्यात आले होते. पण महिना लोटला तरी माझ्या नावाची घोषणा झाली नाही. त्यामुळे मी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली. त्यानंतर राज्यसभा आली. तेव्हा मी राज्यसभेवर जाण्याचा आग्रह धरला. पण पक्षाने सुनेत्रा पवार यांना संधी दिली. त्यानंतर दुसरी राज्यसभा आली. तेव्हा नितीन पाटील यांना करायचे ठरले. खरे सांगायचे तर मी त्या व्यक्तीला ओळखतही नाही.

छगन भुजबळ यांनी यावेळी मनोज जरांगे यांच्या फॅक्टरमुळे आपली लीड कमी झाल्याचेही मान्य केले. विधानसभा निवडणुकीत जरांगे पॅटर्न आला. पण जरांगे कुठेच आले नाहीत. ते येवल्यात आले आणि लीड कमी झाले. मी ६० हजारांनी निवडून आलो. त्यानंतर मला पक्षश्रेष्ठींनी विधानसभेचा राजीनामा देण्याची सूचना केली गेली. पण मी माझ्या लोकांना वाऱ्यावर कसे सोडणार? मला वाटले माझे नाव मंत्रिपदासाठी येईल. कारण, मी पक्षाच्या स्थापनेपासून पक्षासोबत आहे. अजित पवारांना पहिला पाठिंबा देणाराही मीच होतो. अजित पवारांचे नेतृत्व चांगले आहे. पण मानसन्मानाला धक्का लागला तर ते अजिबात योग्य नाही, असे भुजबळ म्हणाले.



### सरपंच संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना हाल-हाल करून मारा

**दुसरीकडे, एकेठिकाणी बोलताना छगन भुजबळ यांनी मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी नव्हे तर हाल – हाल करून मारण्याची मागणी केली. संतोष देशमुख यांना अत्यंत अमानुषपणे मारण्यात आले. राक्षसही अशी कृती करणार नाही. परभणीच्या प्रकरणात पोलिसांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना ठार मारले. ते मराठा होते की दलित होते हा प्रश्न नाही. ते दोघेही माणसे होती. त्यांना कशा पद्धतीने तुम्ही मारले. सर्वच घटकांनी त्याचा निषेध केला पाहिजे व लढायला पाहिजे. या प्रकणी एखादा या समाजाचा आहे म्हणून हे करा व तो दुसऱ्या समाजाचा आहे म्हणून विरोध करा हे मला काही पटत नाही. दुसऱ्या समाजावर हल्ला करणे हे काही बरोबर नाही. दुसऱ्या समाजावर ठपका ठेवणेही बरोबर नाही. तुमच्या दुःखामध्ये व रागामध्ये मी सुद्धा सहभागी आहे. त्यांना फासावर नाही असे हाल हाल करून मारा, असे ते म्हणालेत.**

# राज्यमंडळाने त्या निर्णयात केला मोठा बदल;आंदोलनाचा धसका घेत अखेर मागणी मान्य

## विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे धरणे आंदोलन स्थगित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्यमंडळाच्या त्या निर्णयाविरोधात नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पुकारण्यात आले धरणे / निदर्शने आंदोलन तसेच दहावी / बारावी परीक्षेवर बहिष्कार आंदोलन मागणी मान्य केल्याने स्थगित करण्यात आले आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (राज्यमंडळ) यावर्षीपासून दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये मुख्याध्यापक आणि शिक्षकांना (आस्थापनाव्यतिरिक्त) अन्य शाळांमध्ये केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक म्हणून काम करावे यासाठीचा निर्णय घेण्यात आलेला होता. सदर निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वाखाली नागपूर / अमरावती विभागीय बोर्ड कार्यालयासमोर १ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत धरणे / निदर्शने आंदोलन पुकारण्यात आले होते. सोबतच आमदार सुधाकर अडबाले यांनी राज्यातील शिक्षकांवर अविश्वास दर्शविणारा सदर निर्णय रद्द न झाल्यास ११ फेब्रुवारीपासून सुरु होणाऱ्या बारावी व २१ फेब्रुवारीपासून सुरु होणाऱ्या इयत्ता दहावी परिक्षेदरम्यान बहिष्कार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राज्यमंडळाला दिला होता. त्यामुळे राज्यमंडळाने २९ जानेवारी



२०२५ रोजी पत्रक काढून निर्णयात बदल करण्यात आला. यामुळे शिक्षकांना मूळ आस्थापना सोडून अन्य केंद्रावर जाण्यापासून दिलासा मिळाला आहे. आंदोलनातील प्रमुख मागणी मान्य करण्यात आल्याने सदर धरणे / बहिष्कार आंदोलन स्थगित करण्यात आले.नागपूर आणि अमरावती विभागातील सर्व समविचारी शिक्षक संघटना आणि शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला होता. शेवटी, राज्यमंडळाने शिक्षक संघाच्या मागणीला मान देऊन या निर्णयात बदल केल्याने शिक्षकांच्या एकजुटीच्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे.

# अपघातात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांची खासदार प्रतिभा धानोरकर यांचेकडून भेट

**वरोरा । प्रतिनिधी**

नागपुर-चंद्रपूर महामार्गावर येन्सा (वरोरा) गावाजवळ झालेल्या अपघातामध्ये मृत झालेल्या शेतमजूर स्व.सरिता बुरटकर आणि स्व. रंजना झुणझुनकर यांच्या कुटुंबियांची खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी त्यांच्या घरी भेट देऊन सांत्वन केले व आस्थेने चौकशी केली.

या दोन्ही कुटुंबाला शक्य त्या सर्व पातळींवर मदत करण्याचे आश्वासन खासदार धानोरकर यांनी देऊन काही आर्थिक मदत दिली. यापूर्वी त्यांनी ऊपजिल्हा रूग्णालयात जाऊन भरती असलेल्या जखमींची विचारपूस करत योग्य ऊपचाराचे निर्देश वैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले. चंद्रपूर येथे ऊपचार घेत असलेल्या रूग्णांचीही चौकशी केली. मृत्युमुखी पडलेल्या शेतमजूरांचे परीवारास व जखमी रूग्णास शासकीय मदत मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगीतले. यावेळी नायब तहसीलदार मधुकर काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रफुल्ल खुजे ,माजी नगराध्यक्ष विलास टिपले,माजी नगरसेविका मंगला पिंपळकर, खासदार प्रतिनीधी सुभाष दांदडे उपस्थित होते.



# महाविकास आघाडीला गळती लागल्याचे दिसेल:अनेक खासदार, आमदार आमच्या संपर्कात-गिरीश महाजन

**नाशिक (वृत्तसंस्था)**-सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी वेगाने घडताना दिसत आहेत. त्यात 'ऑपरेशन टायगर'ची देखील चांगलीच चर्चा रंगली आहे. ठाकरे गटातील अनेक नेते, आमदार, खासदार हे शिवसेना शिंदे गटात जाणार असल्याचे बोलले जात आहे. याबाबत मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी भाष्य केले होते. मात्र, कुठल्याच आमदार किंवा खासदाराने यावर थेट भाष्य केले नाही. आता भाजप नेते व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे.

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी येत्या काही दिवसातच महाविकास आघाडीला गळती लागल्याचे दिसेल, असे म्हंटले आहे. ते म्हणाले, शिवसेना ठाकरे गटाचे, काँग्रेस पक्ष असो किंवा शरद पवार गटाचे आमदार, खासदार, पदाधिकाऱ्यांसह अनेक लोक आमच्या संपर्कात आहेत. ते सर्व महायुतीत यायला इच्छुक आहेत. दररोज संपर्क सुरू आहे. नगरसेवकांना मुख्य प्रवाहात यायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे यांच्यावर त्यांचा विश्वास आहे. येत्या काही दिवसातच याची सर्वांना प्रचीती आल्याचे दिसेल, असा इशारा देखील गिरीश महाजन यांनी दिल आहे.महाराष्ट्रात सध्या पालकमंत्री पदावरून वाद सुरू आहेत. नाशिक येथे शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री दादा भुसे यांना पालकमंत्री पद मिळावे अशी शिवसैनिकांची इच्छा आहे. मात्र, गिरीश महाजन यांच्या नावाची निवड करण्यात आली होती. यावरून देखील महायुतीमध्ये वाद निर्माण झाला असून आता रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्री पदाच्या नावांना स्थगिती देण्यात आली आहे. यावर लवकरच तोडगा काढण्यात येईल असे गिरीश महाजन यांनी म्हंटले आहे.गिरीश महाजन म्हणाले, तीनही पक्ष तोलामोलाचे आहेत. म्हणून प्रत्येकाला आपल्या पक्षाचा पालकमंत्री व्हावे असे वाटत आहे. नाशिकमध्ये यापूर्वी कुंभमेळा झाला तेव्हा मी पालकमंत्री होतो. आता पुन्हा दीड दोन वर्षांनी नाशिक कुंभ भरणार आहे, म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मला पालकमंत्री केले होते. कुंभाचे नियोजन सुरळीत व्हावे, अशी मुख्यमंत्र्यांची इच्छा आहे, असे गिरीश महाजन यांनी सांगितले.पुढे बोलताना गिरीश महाजन म्हणाले, कुंभमेळ्याचे मोठे चॅलेंज आहे. गेल्या वेळेपेक्षा दुप्पट संख्येने भाविक येतील असा अंदाज आहे. गेल्यावेळी स्वच्छ सुंदर कुंभमेळा आपण आयोजित केला होता. त्यामुळे नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावर नियुक्त केले होते. हा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा होता. आता नाशिक असो वा रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री तीनही पक्षाच्या संम्मतीनेच होणार असल्याचा दावा गिरीश महाजन यांनी केला आहे.

## आ.सुधीर मुनगंटीवार यांचा एक कॉल अन् सोनपेठ तीर्थस्थळाचा प्रश्नच सुटला!

# शेगाव,आळंदीप्रमाणे होणार विकास ; २७ जानेवारीला निवेदन २९ जानेवारी विषय मंजूर;मुख्यमंत्र्यांनी दिले कार्यवाहीचे आदेश

**परभणी । प्रतिनिधी**

एखादे काम होणार असेल तर हो म्हणायचे. होणार नसेल तर स्पष्ट सांगायचे. पण काम पेंडिंग ठेवायचे नाही. त्यातही एखादे काम आवश्यक असेल तर 'ऑन दि स्पॉट' त्याचा निकाल लावायचा. ही गुणवैशिष्ट्ये महाराष्ट्रात बोटावर मोजण्याएवढ्या लोकांकडे आहेत. त्यात माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांचा आवर्जून समावेश होतो. याची प्रचिती देणारा प्रसंग अलीकडेच घडला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तीर्थक्षेत्राच्या विकासाचा प्रश्न आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या फक्त एका कॉलने सुटला.

वारकरी संप्रदायाचे संत वेदांत केसरी ब्र. भू. रंगनाथ महाराज (सोनपेठकर) यांचे सोनपेठ येथे जन्म व समाधीस्थळ आहे. सोनपेठ या तीर्थ स्थळाचा विकास शेगांव, आळंदीप्रमाणे व्हावा अशी सर्वांची इच्छा होती. त्यासाठी रंगनाथ महाराजांचे भक्तगण गेल्या काही वर्षांपासून प्रयत्नरत होते. जिल्हाधिकारी कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत उंबरठे झिजवूनही हाती काहीच आले नाही. अखेर ब्र. भू. रंगनाथ महाराज जन्मभूमी विकास समितीने आमदार सुधीर मुनगंटीवार यांना गाठले.

परभणी आणि चंद्रपूरमध्ये जवळपास पाचशे किलोमीटरचे अंतर आहे. शिवाय मुनगंटीवार मंत्रिमंडळात नाहीत. पण आता तेच आपलं काम करू शकतात, असा दृढ विश्वास समितीला होता. आ.मुनगंटीवार यांच्याकडे प्रस्ताव येताच त्यांनी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना फोन केला. सोनपेठ तीर्थक्षेत्राचा प्रश्न जिल्हा नियोजन बैठकीत घेण्यास सांगितले. 'तुम्ही विषय मंजूर करा मी माननीय मुख्यमंत्र्यांशी आणि संबंधित विभागाशी बोलतो', असा विश्वास दिला. पालकमंत्री मेघना बोर्डीकर आणि सोनपेठ-पाथरीचे आमदार राजेश विटेकर यांनी २९ जानेवारीच्या जिल्हा नियोजन आणि



विकास परिषदेच्या बैठकीत विषय मांडला. अनेक काही वर्षांपासून अडगळीत पडलेला सोनपेठ तीर्थ स्थळाच्या विकासाचा प्रश्न निकाली लागला. आ.सुधीर मुनगंटीवार नावाची जादू काय असते, याची पुन्हा एकदा प्रचिती आली.

विशेष म्हणजे इकडे जिल्हा नियोजन आणि विकास परिषदेत हा प्रश्न निकाली लागायचाच होता. आणि मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनही सोपवले. ब्र. भू. रंगनाथ महाराज जन्मभूमी विकास समितीचे पदाधिकारी डॉ. बालाजी पारसेवार, ब्रह्मानंद सुधाकर चक्करवार, बालाजी वांकर, बालाजी पदमवार, नागेश शेटे, जीवन बसेट, आनंद डाके, गजानन गुंडावार, अनिल डुब्बेवार यांनी हे निवेदन दिले.सोनपेठ तीर्थ स्थळाचा शासनाच्या 'ब' वर्ग पर्यटन स्थळात समावेश करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना करण्यात आली. मुख्यमंत्र्यांनी तातडीने त्यासंदर्भात निर्देश दिले. सोनपेठ तीर्थ स्थळाचा समावेश शासनाच्या पर्यटन स्थळात करणे. आणि शेगांव, आळंदी तीर्थ स्थळा प्रमाणे विकास करण्याच्या विनंतीला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यादृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी संबंधीत विभागाला दिल्या. समितीने २५ जानेवारीला मुनगंटीवार यांची नागपुरात भेट घेतली. तिथे त्यांना सोनपेठच्या विकासासंदर्भात निवेदन दिले. मुनगंटीवार यांनी गांभिर्य लक्षात घेऊन पालकमंत्र्यांना फोन केला. २७ जानेवारीला मुख्यमंत्र्यांना निवेदन सोपवण्यात आले. २९ ला जिल्हा नियोजन बैठकीत विषय मंजूर झाला. अनेक वर्षे ताटकळत असलेल्या विषयाचा निकाल आ.मुनगंटीवार यांनी अवघ्या चार दिवसांत लावला. रंगनाथ महाराजांच्या भक्तांना आणि सोनपेठवासीयांना आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या 'त्या' एका कॉलने न्याय मिळाला. सोनपेठ तीर्थ स्थळाच्या विकासाचा प्रश्न निकाली निघाला. त्यामुळे सोनपेठवासी आणि राज्यभरातील रंगनाथ महाराजांचे भक्त आ.सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानत आहेत. समाज माध्यमांवर 'वाघ हा वाघच असतो' असे हॅशटॅग व्हायरल करत आहेत.

# गॅस लाईनचे रखडलेले काम व गाळेधारकांच्या प्रश्नावर बैठक

## खासदार निलेश लंके यांच्याकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती

**पारनेर । प्रतिनिधी**

मोठा कालावधी होऊनही नगर शहरातील गॅस लाईनचे काम पुर्ण झाले नसल्याबद्दल तसेच पालिका हद्दीमधील भाडेतत्वावारील गाळेधारकांच्या भाडेवाढीसंदर्भात आयोजित बैठकीत खासदार नीलेश लंके यांनी पेट्रोलियम कंपनी, गॅस लाईनचे काम करणारी कंपनी तसेच महापालिका अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. या बैठकीस पालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त विजयकुमार मुंडे, सहाययक आयुक्त प्रियंका शिंदे, बांधकाम विभागाचे उपअभियंता मनोज पारखे, प्रभाग अधिकारी मेहेर लहारे, बीपीसीएल कंपनी तसे गॅस पाईपलाईनचे काम करणाऱ्या एजन्सीचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. गॅस लाईनच्या रेंगाळलेल्या कामासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी संसदेच्या अधिवेशनादरम्यान पेट्रोलियम मंत्री हरजीत सिंग यांची भेट घेतली होती. या भेटीवेळी स्थानिक पातळीवर बैठक घेउन अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याबाबत मंत्री सिंग यांनी सुचित केले होते.

नगरमध्ये पार पडलेल्या बैठकीत विविध तांत्रीक बाबींबाबत खा. लंके यांनी विचारणा केली असता समाधानकारक उत्तरे मिळू शकले नाही. येत्या चार महिन्यात हे काम पुर्ण झाले नाही तर कार्यवाही करून कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल असा इशारा खा. लंके यांनी यावेळी दिला.गॅस पाईपालाईनसंदर्भात काही बाबींबाबत महापालिकेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळत नसल्याने कामाला विलंब होत असल्याचे एजन्सीकडून सांगण्यात आले. खा. लंके यांनी त्यासंदर्भात आयुक्त डांगे यांना कंपनीस आवष्यक त्या परवाणग्या देण्यासंदर्भात सुचित केले. प्रभाग एक, दोन, चार, पाच या भागात पाईपलाईनचे काम पुर्ण झाले आहे तर सहा, सात, आठ व नऊ प्रभागातील कामासाठी पालिकेडे प्रस्ताव देण्यात आला असल्याची माहीती यावेळी देण्यात आली. यावेळी मा. महापौर अभिषेक कळमकर, मा. नगरसेवक योगीराज गाडे, दीप चव्हाण, राजेंद्र चव्हाण, विक्रम राठोड, राजेंद्र दळवी, दिलीप नांगरे, भैयया परदेशी, संजय झिंजे, गौरव ढोणे, चंद्रकांत उजागरे, तारीख कुरेशी आदी उपस्थित होते. शहरातील पालिकेच्या गाळेधारकांचे भाडे करारासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीमध्ये आयुक्त, जिल्हाधिकारी, नगर रचनाकार, जिल्हा उपनिबंधक व इतर अधिकाऱ्यांचा समावेश असतो. या समितीचा ठराव आला का अशी खा. लंके यांनी विचारणा केली असता आयुक्त डांगे निरूत्तर झाले. किती भाडे आकारले जाते ? किती टक्के भाडेवाढ करण्यात आली यावरही अधिकारी उत्तर देऊ शकले नाहीत. शहरातील विविध भागांतील गाळेधारकांना त्यांच्या भागातील बाजार मुल्यांकनानुसार भाडे आकारणी करण्यात येते का अशी विचारणा खा. लंके यांनी केल्यानंतर एकाच मुल्यांकनानुसार भाडे आकरणी करण्यात येते अशी तक्रार गाळेधारकांकडून करण्यात आली. गाळेधारकांची भाडेवाढ तसेच शहरातील गॅस पाईपलाईनच्या तक्रारीसंदर्भात खा. नीलेश लंके यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली.



# केंद्रिय मंत्री कपिल पाटील यांनी दिली कल्याणच्या सुभाष मैदानात भेट

**ठाणे । प्रतिनिधी**



खेलो इंडिया ही देशातील एक महत्त्वाची स्पर्धा आहे म्हणून विविध राज्यांतील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्याची पात्रता बाळगून आहेत व ग्रामीणसह शहरी भागांतील खेळाडूंना एक उत्तम प्लॉटफॉम स्पर्धेमार्फत भेटत असतो याच खेलो इंडिया उपक्रमांतर्गत कल्याण मध्ये इनडोअर स्टेडियम उभारण्याचा माजी केंद्रिय मंत्री कपिल पाटील यांचा मानस आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार खेलो इंडिया उपक्रमांतर्गत कल्याण येथील सुभाष मैदानात इनडोअर स्टेडियम उभारण्यासाठी पाटीलयांच्या प्रयत्नाने साडेसात कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच या इनडोअर स्टेडियममध्ये क्रिकेट, कबड्डी, बॅटमिंटन, व्हॉलीबॉल, मॅटवरील कबड्डी, जॉगिंग ट्रॅक आदींचा समावेश करण्यात आला आहे. कल्याणमधील होतकरू खेळाडूंसाठी इनडोअर स्टेडियम वरदान ठरणार आहे. मात्र, या इनडोअर स्टेडियमच्या कामाला विरोध होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांकडून का विरोध होत आहे व त्यावर काय मार्ग काढता येईल यासाठी सुभाष मैदानाला केंद्रिय मंत्री कपिल पाटील यांनी भेट देऊन सर्वांना विश्वासात घेऊनच पुढचे पाऊल टाकण्याचे आश्वासन दिले आहे.इनडोअर स्टेडियम उभारताना कोणत्याही लोकप्रतिनिधी, खेळाडू किंवा नागरिकांवर निर्णय लादू नये. सर्वांची भूमिका समजून महापालिकेकडून निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत महापालिकेकडून नव्याने स्टेडियमचा डीपीआर बनविण्याची कपिल पाटील यांच्याकडून सूचना देण्यात आल्या असून त्याला महापालिका प्रशासनाकडून मंजुरी देण्यात आली या वेळी भाजपाचे माजी आमदार श्री. नरेंद्र पवार, मनसेचे माजी आमदार श्री. प्रकाश भोईर, जिल्हाध्यक्ष श्री. उल्हास भोईर, भाजपाचे माजी नगरसेवक श्री. अर्जुन म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस श्री. प्रेमनाथ म्हात्रे, शहराध्यक्ष श्री. वरुण पाटील यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

# जामखेडमध्ये राज्यस्तरीय एक दिवसीय मराठी साहित्य संमेलन

**जामखेड । प्रतिनिधी**



जामखेडच्या वतीने राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन ६ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद जेष्ठ ग्रामीण साहित्यिक आणि कवी मा. विजयकुमार मिठे भूषविणार आहेत. मराठी साहित्य प्रतिष्ठानचे हे तिसरे राज्यस्तरीय साहित्य संमेलन आहे, ज्याचे उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा. ना. प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य मा. प्रकाश होळकर व डॉ. राजेश गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीला मान मिळेल.साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. मधुकर राळेभात यांनी या संमेलनाच्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. एक दिवस चालणाऱ्या या संमेलनात ग्रंथदिंडी, परिसंवाद, प्रकट मुलाखत, सांस्कृतिक कार्यक्रम, ग्रंथ पुरस्कार वितरण, कवी संमेलन अशा विविध आकर्षक कार्यक्रमांची योजना आहे. सकाळी ८.०० वाजता संमेलनाध्यक्ष मा. विजयकुमार मिठे यांच्या हस्ते ग्रंथ पूजन करून ग्रंथदिंडीचे उद्घाटन होईल. मराठी भाषा व आजची सद्यस्थिती या विषयावर परिसंवाद होईल, ज्यामध्ये डॉ. विजय जाधव, डॉ. किसन माने व डॉ. सुधाकर शेलार सहभागी होणार आहेत. परिसंवादाचे अध्यक्ष डॉ. फुला बागुल असतील, तर प्रमुख उपस्थिती दै. लोकमतचे संपादक मा. सुधीर लंके यांची असेल.दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध चित्रपट गीतकार मा. बाबासाहेब सौदागर यांची प्रकट मुलाखत होईल, त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. ग्रंथ पुरस्कार वितरणामध्ये छत्रपती राजे संभाजी साहित्य पुरस्कार देऊन मान्यवर साहित्यिकांचा गौरव केला जाईल. यावर्षीपासून दिला जाणारा कवीवर्य आ.य. पवार सर्वोत्कृष्ट काव्यसंग्रह साहित्य पुरस्कार प्रसिद्ध चित्रपट गीतकार मा. बाबासाहेब सौदागर यांच्या मृगपक्षी काव्यसंग्रहाला प्रदान केला जाईल.सायंकाळी सुप्रसिद्ध कवी शंकर वाडेवाले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. शिक्षण सचिव मा. अनिल गुंजाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत कवी संमेलन होईल. या कवी संमेलनात महाराष्ट्रातील अनेक मान्यवर कवी सहभागी होणार आहेत. साहित्य संमेलनाचा समारोप उपस्थित सर्वांच्या स्नेह भोजनाने होईल. साहित्यप्रेमी, लेखक-कवी, पत्रकार यांना या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# अलिबागच्या समुद्रकिनार भव्य मत्स्यालय उभारले जाणार

**रायगड । प्रतिनिधी**

अलिबाग नगर परिषदेच्या विशेष अनुदान योजने अंतर्गत अलिबाग समुद्रकिनारी भव्य मत्स्यालय उभारले जाणार आहे. या प्रकल्पाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीमध्ये लवकरच भूमिपूजन होणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने ६० कोटी रुपयांचे विशेष अनुदान मंजूर केलेले आहे. विविध प्रकारचे सागरी मासे या मत्स्यालयात ठेवले जाणार आहेत. अलिबागच्या समुद्र किनाऱ्यावर असलेल्या मैदानात या मत्स्यालयाची उभारणी केली जाईल. कंटेनर पद्धतीच्या या अभिनव मत्स्यालयात बोगद्याच्या आतून सागरी माशांचे विश्व अनुभवायला मिळणार आहे. या भूमिपूजन सोहळ्याला रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे आणि माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम लवकरच पार पडणार आहे अशी माहिती मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी दिली.

# शासकीय सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्या-किसान सभेची मागणी

**परभणी । प्रतिनिधी**



राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा आणि खरेदी प्रक्रियेत गती यावी, यासाठी किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. केंद्र सरकारच्या हमीभाव खरेदी केंद्रांची मुदत ३१ जानेवारी रोजी संपत असून ती वाढवावी, तसेच राज्य सरकारने ११०८ रुपये सहयोग राशी जाहीर करून ६००० रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन खरेदी करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांना हमीभावाचा लाभ मिळावा यासाठी राज्य सरकारने ११०८ रुपये सहयोग राशी देत ६००० रुपये दराने खरेदी करावी, अशी मागणी आहे. खरेदी केंद्रांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा असून, वजन काटा व्हायला पाच ते सहा दिवस लागत आहेत. परिणामी, शेतकऱ्यांना अतिरिक्त वेळ आणि पैसा खर्च करावा लागत आहे. सध्या बाजार समित्यांमध्ये ४१५० रुपये दर मिळत असून, तो शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत अपुरा आहे.खरेदीसाठी आवश्यक बारदाना उपलब्ध करून देण्यात यावा आणि बाजार समित्यांनी हमाली-चाळणी दर निश्चित करावा. हमाली-चाळणीच्या नावाखाली शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या संस्था व कंपन्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली.सोयाबीन शेतकरी सध्या बाजारभावातील घसरण आणि शासकीय खरेदीतील दिरंगाईमुळे अडचणीत सापडला आहे. यावर तातडीने निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होईल, असा इशारा किसान सभेने दिला आहे. यावेळी कॉ. ओंकार पवार, कॉ. शिवाजी कदम, सुरेश इखे, सुनील पौळ, संदीप जाधव उपस्थित होते.

## वादग्रस्त परीक्षा केंद्रांना पुन्हा मान्यता बहाल; काही तांड्यांवर सुद्धा परीक्षा केंद्र

# छत्रपती संभाजीनगर बोर्डाचा अर्थपूर्ण निर्णय:खोल्या नाहीत की आसन व्यवस्थाही नाही, परंतु केंद्रांना मान्यता बहाल

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

गेल्या काही वर्षांपासून सामूहीक कॉपीसह अन्य गैरप्रकारात संपूर्ण राज्यात अक्षरशः बदनाम ठरलेल्या परभणी जिल्ह्यातील ठराविक गावातील त्या वादग्रस्त परिक्षा केंद्रांना छत्रपती संभाजीनगरच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने 'अर्थपूर्ण' निर्णय घेवून परवानग्या बहाल केल्या आहेत. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी या जिल्ह्यात या वादग्रस्त केंद्रांवर सामूहीक कॉपींसह गैरप्रकारांचा कळस दिसून येईल, अशी स्पष्ट चिन्हे आहेत.

गेल्या काही वर्षात या जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रातील काही तथाकथित संस्थाचालकांसह दलालांच्या साखळीने इयत्ता दहावी व इयत्ता बारावीच्या परिक्षांमधून मोठा धूमाकूळ घातला आहे. विशेषतः केवळ अर्थपूर्ण हेतू डोळ्यासमोर ठेवून या साखळीने इयत्ता दहावी व बारावीच्या परिक्षांमधून संबंधित परिक्षार्थीस हमखास उत्तीर्ण व गुणवत्तासुध्दा प्राप्तीचे आश्वासने देवून पालकांकडून प्रत्येक विषयामागे हजारो रुपये उकळण्याचे प्रकार सर्रास सुरु केलेआहेत. साखळीच्या या प्रयत्नांना दुर्देवाने मोठे यश सुध्दा प्राप्त होत आले आहे. त्यामागे दलालांच्या या साखळीला जिल्हा परिषद शिक्षण विभागांतर्गत काही झारीतील शुक्राचार्य तसेच छत्रपती संभाजीनगरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी यांचे खूलेआमपणे सर्वतोपरि सहकार्य कारणीभूत ठरले आहे. त्यामुळेच या जिल्ह्यात दहावी व बारावीच्या परिक्षा कॅश करण्याकरीता या साखळीचे मनोबल दरवर्षी वाढत राहिले आहे. यावर्षीसुध्दा साखळीने या परिक्षा कॅश करण्याकरीता चंग बांधला आहे. त्यासाठी परिक्षांपूर्वीच या साखळीने शहराऐवजी आडवळणावरील खेड्या पाड्यातील इमारती, खोल्या, आसन व्यवस्था किंवा अन्य मूलभूत सोयी सुविधांपासून कोसोदूर असणार्या शाळा, महाविद्यालयांनाच परिक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळावी या दृष्टीने लक्ष केंद्रित केले.जिल्हा परिषद शिक्षण विभाग असो, छत्रपती संभाजीनगरच्या बोर्डात थेट प्रस्ताव दाखल करीत त्यास परिक्षा केंद्र म्हणून मान्यतासुद्धा प्राप्त केली आहे. छत्रपती संभाजीनगर मंडळाने जाहीर केलेल्या परीक्षा केंद्रांच्या यादीवर व केंद्रांवरील विद्यार्थ्यांची संख्येवर सहजपणे नजर फिरवली तर यावर्षीही परीक्षांदरम्यान मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होणार हे स्पष्ट होत आहे.विषेशतः परिक्षांच्या काळामध्ये या केंद्रांवर शामीयाने उभारुन, जमीनीवर मॅट किंवा सतरंज्या टाकून परिक्षार्थींना परिक्षेस बसविण्याचे, पाठोपाठ अगदी मुक्तपणे कॉप्या पुरवून किंवा सामूहीक कॉप्यांना पूर्णतः मूभा देवून परिक्षार्थींना यशस्वी करण्याचे फंडे पून्हा खूलेआमपणे अवलंबविले जाणार हेही स्पष्ट होत आहे. या जिल्ह्यात परिक्षा दरम्यान काही वादग्रस्त केंद्रांवर थेट ध्वनीक्षेपक लावून परिक्षार्थींना प्रश्नांची उत्तरे गार्डींग करणार्या शिक्षक, प्राध्यापकांमार्फत सांगण्याचे प्रकारही घडले आहेत. त्यापेक्षा कहर काही केंद्रांवर नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या ताफ्याऐवजी कोचिंग क्लासेसमधून शिकविणार्या खाजगी व्यक्तींना तैनात करीत परिक्षार्थींना सर्वतोपरि मदतीचे अर्थपूर्ण प्रकार घडले आहेत.परिक्षा केंद्रांवरील या अभूतपूर्व गैरप्रकारांविरोधात शिक्षण विभाग असो, महसूल विभागानेसुध्दा 'ब्र' काढू नये या दृष्टीनेसुध्दा दलालांच्या या साखळीने यशस्वी असे प्रयत्न केले आहेत. त्यामुळे या दोन्ही परिक्षांमधील वादग्रस्त केंद्रांवरील गैरप्रकाराचे किस्से आता बाहेरसुध्दा येईनासे झाले आहेत.ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांनी वर्गमित्रांच्या पुण्यातील स्नेहमीलन कार्यक्रमात परभणी जिल्ह्यातील काही वादग्रस्त केंद्रांवरील परिक्षांमधील गैरप्रकारांचे किस्से आपल्या भाषणातून ऐकविले होते. गंगाखेड तालुक्यातील एका गावच्या लोकसंख्येच्या तूलनेत तेथील शाळेतील केंद्रांवर परिक्षार्थी म्हणून बसणार्या मुला-मुलींची दुप्पट-तीनपट संख्या व केंद्रांभोवती एसटीच्या बसेससह खाजगी आराम बसेस व चारचाकी वाहनांचा गराडा, जत्रे सारखे चित्र, गर्दीचे किस्से कथन केले. व शैक्षणिक क्षेत्रातील अभूतपूर्व गोंधळाबद्दल, किसळवाण्या प्रकाराबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली होती. तरीसुध्दा या जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात धूमाकुळ घालणार्या व दरवर्षी लाखो रुपयांची कमाई करणार्या तथाकथित संस्थाचालकांसह दलालांना त्याचे फारसे शल्य वाटले नाही. शिक्षण विभाग असो, बोर्डानेसुध्दा त्यातून ओळीने प्रतिक्रिया दिली नाही कि बोध घेतला नाही. त्यामुळेच दरवर्षी बहुचर्चित व काळ्या यादीत टाकलेल्या वादग्रस्त केंद्रांना बोर्डाद्वारे मान्यता, दलालांच्या साखळीद्वारे पॅकेज वसूली व केंद्रांवर परिक्षेदरम्यान गैरप्रकारांचे कळस या गोष्टी सूरू राहिल्या आहेत. जिल्हावासीयांनाही त्या गोष्टी अंगवळणी पडल्या आहेत.या जिल्ह्यातील गंगाखेड, पालम व जिंतूर या तीन तालुक्यातील वाडी तांड्यावरीलसुध्दा इमारत, वर्गखोल्या, आसन व्यवस्था व अन्य मूलभूत सोयी सुविधांपासून कोसोदूर असणार्या शाळा व महाविद्यालयांना छत्रपती संभाजीनगरच्या मंडळाने परिक्षा केंद्र म्हणून मान्यता बहाल केली आहे. त्या त्या केंद्रांवर पाचशे सहाशेंच्या वर परिक्षार्थी बसविले आहेत. परिक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळविण्याकरीता शिक्षण विभागाने काही निष्कर्ष ठरविले आहेत. त्या निष्कर्षांची पूर्तता करणार्या केंद्रांनाच परिक्षा केंद्र म्हणून मान्यता द्यावी, हे अपेक्षित आहेत. परंतु, या जिल्ह्यात काही वादग्रस्त केंद्रांना मान्यता बहाल करतेवेळी इमारतीच नसणार्या, पूरेशा खोल्या नसणार्या, संरक्षण भिंत नसणार्या तसेच वीज, पाणी किंवा अन्य मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध नसणार्या शाळांना परिक्षाकेंद्र म्हणून मान्यता बहाल केली आहे. मंडळातून सेवानिवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याची अर्थपूर्ण भूमिका त्यास कारणीभूत असल्याची माहिती समोर आली आहे.त्यामुळे जिल्हा परिषद अंतर्गत स्थानिक शिक्षण विभागातील प्रामाणिक आधिकारी तसेच शिक्षण क्षेत्रातील जाणकार अस्वस्थ झाले आहेत. परिक्षा दरम्यान या केंद्रांवर सर्व गोष्टींबाबत आनंदी आनंद असणार हे या साऱ्यांना कळून चुकले आहे

# वीज पुरवठा बंद केल्यावरही ग्राहकांना बिल

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील उसरागोंदी गावातील ६५ वर्षीय शेतकरी मोरेश्वर उरकुडा निंबार्ते यांनी विद्युत विभागाविरोधात गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, २१ जानेवारी २०२० रोजी त्यांच्या शेतावरील विजेचे कनेक्शन काढून टाकल्यानंतरही, विद्युत विभाग त्यांना अंदाजे रीडिंग आधारित बिले पाठवत आहे. यामुळे त्यांना आर्थिक अन्याय सहन करावा लागत असून, त्यांनी या प्रकरणी लेखी चौकशीची मागणी केली आहे. मोरेश्वर निंबार्ते म्हणतात, कनेक्शन बंद केल्यानंतरही बिले येणे याचा अर्थ, मिटर रीडिंग घेतलेच नाही जात. विभाग अनियमित पद्धतीने अंदाजे बिले तयार करतो. हा गुन्हा आहे आणि याची लगेच चौकशी व्हायला हवी. त्यांनी याआधीही अर्ज करून सदर बिले भरण्यास नकार दिला आहे. निंबार्ते यांनी विद्युत विभागाला पाठवलेल्या अर्जाची प्रत, बिले, आणि कनेक्शन बंदीची नोटीस सादर केली आहे. त्यांनी हा प्रकरण संबंधित सर्व प्राधिकरणांना पत्रे पाठवून कृत्याची मागणी सुद्धा केली आहे. प्रकरणी विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतीही स्पष्टता दिलेली नाही. विद्युत नियमांनुसार, कनेक्शन बंद झाल्यानंतर मिटर रीडिंग घेणे बंधनकारक आहे. अन्यथा, ग्राहकांना फिक्स्ड चार्ज सोडून बिले आकारता येत नाहीत. निंबार्ते यांच्या केसमध्ये हा नियम मोडला गेल्याचे दिसते.राष्ट्रीय किसान मोर्च्याचे संयोजक अभय रंगारी यांनी म्हटले आहे, अशा प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांना सातत्याने छळले जाते. आम्ही या प्रकरणी जिल्हा प्रशासनाकडे लगेच हस्तक्षेपाची मागणी केली.



# पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर यवत गावा जवळ भीषण अपघात जेष्ठ नागरिकाचा मृत्यू

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर यवत गावाजवळ एका भीषण अपघातात जेष्ठ नागरिक दिलीप निवृत्ती दोरगे (वय ६५) यांचा मृत्यू झाला. अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी १२:४० ते १ वाजेच्या दरम्यान, निवृत्त पोलीस कर्मचारी दिलीप दोरगे हे यवत गावातील रस्ता ओलांडत असताना, एक मोटार सायकल त्यांना धडकली. धडक इतकी जोरदार होती की, दोरगे यांचा जागीच मृत्यू झाला. धडक देऊन मोटार सायकलवरील तिघे त्वरित घटनास्थळावरून पलायन झाले.या अपघातामुळे यवत गावातील नागरिक एकत्र आले आणि धडक देणाऱ्या मोटार सायकलच्या तिघांबद्दल माहिती मिळवली. संबंधित तिघे उरुळी कांचन परिसरातील असल्याची माहिती प्राप्त झाली असून, यवत पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी संबंधित आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# रेशीम उद्योगाच्या विकासाला गती देणार-पालकमंत्री संजय सावकारे

**भंडारा । प्रतिनिधी**

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे यांनी आज भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यात भंडारा सिल्क उद्योग प्रा. लि., कान्हलगाव (ता. मोहाडी) आणि रेशीम मूलभूत सुविधा केंद्र, जमनी येथे भेट देऊन ऑटोमॅटिक रेलिंग युनिट आणि टसर व तुती रेशीम उद्योग केंद्राची पाहणी केली.

यावेळी पालकमंत्र्यांनी रेशीम शेती उद्योगाच्या वाढीसाठी विविध उपाययोजना, उत्पादन प्रक्रियेसंबंधी माहिती आणि भविष्यातील संधी याविषयी अधिकाऱ्यांकडून सविस्तर आढावा घेतला. रेशीम शेती ग्रामीण भागातील आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. हा उद्योग कृषी संलग्न असून, अल्पकालावधीत अधिक नफा मिळवून देणारा आणि रोजगार निर्मितीस चालना देणारा आहे, असे त्यांनी सांगितले.

रेशीम उद्योग वाढीसाठी विशेष प्रयत्न

भारतात रेशीम धाग्याची मागणी मोठी असली तरी उत्पादन अपुरे असल्याने मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. त्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढविण्यावर भर देण्याची गरज असल्याचे पालकमंत्र्यांनी नमूद केले. सध्या महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांमध्ये तुती रेशीम उद्योग कार्यरत आहे, तर टसर रेशीम उद्योग पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात पारंपरिक पद्धतीने चालतो. यामुळे आदिवासी भागातील शेतकऱ्यांना स्थिर उत्पन्नाचा उत्तम पर्याय उपलब्ध होत आहे.

यावेळी आमदार कारेमोरे, जिल्हा परिषद सदस्य यशवंत सोनकुसरे, भंडारा सिल्क उद्योगाचे संचालक खेमचंद सोनकुसरे, पोलीस निरीक्षक सुरेंद्र बेलखेडे, उपविभागीय अधिकारी बालपांडे, प्रभारी तहसीलदार एस. वाय. चांदेवार तसेच विविध प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.पालकमंत्र्यांनी रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी आवश्यक मदत, शासनाच्या विविध योजनांचा लाभ आणि ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीबाबत सकारात्मक धोरण राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या या दौऱ्यामुळे भंडारा जिल्ह्यातील रेशीम उद्योगाला नवी गती मिळण्याची आशा व्यक्त केली जात आहे.



# महाराष्ट्रातील सर्व कार्यालयांमध्ये राष्ट्रगीताने कामकाज सुरू करा

## शाहरुख मुलाणी यांची मागणी

**पालघर । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी कार्यालयांमध्ये कामकाजाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते शाहरुख मुलाणी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्यासह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांना निवेदन पाठवले आहे.

राष्ट्रीय एकात्मता आणि देशभक्तीच्या भावनेला बळ मिळावे म्हणून हा उपक्रम राबवावा, असे मुलाणी यांनी सुचवले आहे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रगीत अनिवार्य असते, मात्र कार्यक्षेत्रात त्याचा अभाव दिसतो. त्यामुळे मंत्रालय, जिल्हाधिकारी कार्यालये, तहसील कार्यालये, ग्रामपंचायती, महापालिका, बँका, कारखाने आणि खासगी कंपन्यांमध्येही राष्ट्रगीताने दिवसाची सुरुवात करण्याचा नियम लागू करावा, अशी त्यांची मागणी आहे.राष्ट्रगीताच्या अनिवार्यता यामुळे शिस्तबद्धता, एकात्मता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. कर्मचारी आणि अधिकाऱ्यांमध्ये देशप्रेमाची भावना अधिक बळकट होईल आणि कामकाजात सकारात्मकता वाढेल, असा विश्वास मुलाणी यांनी व्यक्त केला आहे.राज्य सरकारने या मागणीवर त्वरित निर्णय घ्यावा, अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभारावी आणि जनजागृती अभियान राबवावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. सरकार या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वंचित बहुजन आघाडीचा जन आक्रोश मोर्चा, विविध मागण्या सरकारकडे

**परभणी । प्रतिनिधी**

परभणी येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला, ज्यामध्ये शहीद सोमनाथ सूर्यवंशी, लोकनेते विजय वाकोडे, सरपंच संतोष देशमुख आणि कोंबिंग कार्यवाहीत जखमी झालेल्या नागरिकांना तात्काळ न्याय देण्याची मागणी करण्यात आली. मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी यावर तात्काळ कार्यवाही होऊन, संबंधितांना योग्य न्याय दिला जावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.




वंचित बहुजन आघाडीने सरकारकडे जोरदार मागण्या केल्या, ज्यात शहीद सोमनाथ सूर्यवंशी आणि लोकनेते विजय वाकोडे यांच्या कुटुंबांना एक कोटी रुपये अर्थसाहाय्य देण्यासह, त्यांच्यासाठी शासकीय नोकरीची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली. याचप्रमाणे, शहीद सूर्यवंशी व विजय वाकोडे यांच्या स्मारकांसाठी जागा उपलब्ध करून ते तात्काळ परभणी शहरात उभारण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.परभणी शहरातील कोंबिंग कार्यवाहीत जखमी झालेल्या नागरिकांना २५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्याची मागणी केली असून, पोलिसांच्या मारहाणीच्या प्रकरणात तात्काळ गुन्हे नोंद करून संबंधित पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचीही जोरदार मागणी करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या ॲड. सर्वजित बनसोडे, अनिल जाधव, सुनील मगरे यांनी मोर्चात सहभागी होऊन सर्व मागण्यांवर तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता सांगितली. जनआक्रोश मोर्चाने सरकारला स्पष्ट संदेश दिला की संविधानिक आणि न्यायालयीन प्रक्रिया केल्याशिवाय त्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. या मोर्चामुळे परभणीतील नागरिकांमध्ये एकजुटीची भावना आणि न्यायाची अपेक्षा दृढ झाली आहे.

# रोटेगाव-परसोडा रेल्वे रुळा वर अपघातात व्यक्तीचा मृत्यू



**वैजापूर । प्रतिनिधी**

रोटेगाव ते परसोडा रेल्वे मार्गावर झालेल्या अपघातात बाबासाहेब देवराव कदम (वय ४५, रा. सवंदगाव) यांचा मृत्यू झाला. ही घटना ३० जानेवारी रोजी अघूर शिवार परिसरात घडली.

अपघाताची माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि कदम यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या घटनेचा पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

# करमाळा शहर विकासासाठी २१.७५ कोटींचा प्रस्ताव-नगर विकास मंत्री शिंदे यांचे आदेश

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी ७५ लाख रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, तो नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सादर केला आहे. मुंबई येथील नंदन बंगला येथे झालेल्या भेटीत शिंदे यांनी या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी हा प्रस्ताव मंजुरीसाठी नगर विकास सचिव सचिन सहस्त्रबुद्धे यांच्याकडे पाठवण्याचे आदेश दिले आहेत.३२० कोटींचे प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्याच्या सूचना याशिवाय, करमाळा शहराच्या सुधारित पाणीपुरवठा योजना (अमृत टू), जलशुद्धीकरण प्रकल्प व भुयारी गटार योजनेचा ३२० कोटी रुपयांचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. या योजनेतील कागदपत्रातील त्रुटी दूर करून, आवश्यक जागा संपादित करून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश नगर विकास सचिवांना देण्यात आले आहेत.या निर्णयामुळे करमाळा शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होणार असून, नागरिकांसाठी सोयी-सुविधा वाढणार आहेत.




**प्रस्तावातील प्रमुख कामे**

**शहराच्या चारही दिशांना जाणाऱ्या रस्त्यांचे सुशोभीकरण व रोड डिव्हायडर उभारणे**
**श्रावण नगर, गणेश नगर, मुथा नगर येथील प्रमुख अंतर्गत रस्त्यांचे नूतनीकरण**
**नवीन स्ट्रीट लाइट बसविणे**
**नगरपालिकेच्या मोकळ्या जागांमध्ये वृक्षारोपण**
**करमाळा शहर ते देवीचा माळ रोडचे सौंदर्यीकरण**

# जुनेद शेख यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**गंगापूर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिंगी येथील रहिवासी आणि शेतकरी ते युवा उद्योजक असा संघर्षमय प्रवास करणारे जुनेद शेख यांना राज्य पत्रकार संघ, महाराष्ट्रतर्फे राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.



जुनेद शेख यांना शेतकऱ्यांविषयी विशेष आत्मीयता असून, जे.के. ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून ते शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्याचबरोबर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. सामाजिक कार्याची आवड असलेल्या शेख यांच्या या योगदानाची दखल घेत राज्य पत्रकार संघाने त्यांना प्रतिष्ठेच्या जीवन गौरव पुरस्कारासाठी निवडले आहे.

# सेलू येथे राज्यस्तरीय तालुकाध्यक्षांचा मेळावा आदर्श पत्रकारसंघ पुरस्कार वितरण सोहळा

## जिल्ह्यातील पत्रकारांनी उपस्थित रहावे-प्रभू दिपके

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

सेलू येथे राज्यस्तरीय आदर्श जिल्हा पत्रकार संघ व आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुकाध्यक्षांचा मेळावा शनिवारी (दि.१ फेब्रुवारी) आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उदघाटन पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याहस्ते होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून संजय शिरसाट हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातच पत्रकारितेत योगदान देणार्या पत्रकारांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हाभरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परभणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके यांच्यासह कार्याध्यक्ष लक्ष्मन मानोलीकर व सर्व पदाधिकार्यांनी केले आहे.

सेलूच्या साई नाट्यगृहामध्ये शनिवारी (दि.१) सकाळी ९.३० वाजता आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून यासाठी परिषदेच्या पदाधिकार्यांसह जिल्हा पत्रकार संघ व सेलू तलुका पत्रकार रसंघाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमात रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहेत. त्याच बरोबर राज्यभरातल्या तालुकाध्यक्षांचा मेळावाही संपन्न होणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, उदघाटक पालकमंत्री मेघना बोर्डीकर तर अध्यक्षस्थानी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे असणार आहेत. या सोहळ्यात न्यूज १८ लोकमतचे अँकर व प्रोड्युसर विशाल परदेशी यांचे व्याख्यान होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, यांच्यासह स्वागताध्यक्ष माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे यांची उपस्थित राहणार आहे. तसेच आमदार राजेश विटेकर, माजी आमदार हरिभाऊ लहाने,



माजी आमदार विजय भांबळे, साईबाबा बँकेचे अध्यक्ष हेमंतराव आडळकर, डॉ. संजय रोडगे, अशोक काकडे, नंदकिशोर बाहेती, जयप्रकाश बिहाणी, शेख राज यांची उपस्थिती राहणार आहे. याच सोहळयात पत्रकारितेत योगदान देणारे ज्येष्ठ साहित्यीक तथा पत्रकार डॉ. आसाराम लोमटे, डी.व्ही. मुळे व कांचन कोरडे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या नियोजसाठी परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, डिजीटल मिडीयाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, विभागीय सचिव रवि उबाळे, सचिन शिवशेट्टे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, तालुकाध्यक्ष लक्ष्मण बागल, जिल्हा सरचिटणीस मोहमद इलियास, कार्याध्यक्ष संजय मुंडे, शेख मोहसीन, निसार पठाण, सतिश आकात, लक्ष्मण मानोलीकर, राजू हट्टेकर, रेवणअप्पा साळेगावकर, रामेश्वर बहिरट, डॉ. विलास मोरे, अबरार बेग, रमेश खराडे, राहूल खपले, दिलीप मोरे, पुनमचंद खोना, सतिश गरड, महादेव रिंरी, निशीकांत रोडगे, रोहित झोल, असगर खान, जावेद कुरेशी, श्रीपाद रोडगे, नितीन कुंभकर्ण, निरज लोया, संदिप वरकड, दिपक जडे, महेश राउत, विठ्ठल राउत, गणेश सवणे, वसंत आवटे, आदी पुढाकार घेत आहेत. या सोहळ्यासाठी जिल्हाभरातून पत्रकारांनी मोठ्या संख्येनं उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके, कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर यांच्यासह पदाधिकार्यांनी केले आहे.

# दर्शन पवार व धनंजय घरतला पखवाज विशारद पदवी-संगीत क्षेत्रात मोठी झेप!

**आजच्या तरुणाईला व्यसनांपासून दूर ठेवायचे असेल, तर त्यांच्यात संगीताची आवड निर्माण करणे गरजेचे आहे. दर्शन आणि धनंजय यांच्या यशात त्यांच्या गुरूंसह आई-वडिलांचाही मोठा वाटा आहे. शालेय अभ्यास सांभाळून त्यांनी हे यश मिळवले, याचा विशेष उल्लेख करावा लागेल.**
**– भास्कर घोडविंदे (गुरुजी), संचालक, कृष्णाई पखवाज क्लास**



**ठाणे । रविंद्र धारवणे**

तालुक्यातील कृष्णाई पखवाज क्लासेसच्या दोन विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या पखवाज वादन परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. शेलवली (खं) येथील दर्शन रामचंद्र पवार आणि कासगाव येथील धनंजय बाळू घरत यांनी विशारद पदवी संपादन केली.

या दोघांनाही कृष्णाई पखवाज क्लासचे संचालक भास्कर घोडविंदे गुरुजी, तसेच ठाणे भूषण भाऊबुवा कुर्ले आणि रायगड भूषण मंगेश बुवा बडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

**नित्यनेमाने सराव आणि कठोर मेहनतीचे फळ**

धनंजय घरत आणि दर्शन पवार यांनी शालेय अभ्यास सांभाळत नियमित पखवाजचा सराव केला आणि अखेर परीक्षेत प्रथम श्रेणीत यश मिळवले. पखवाज हे भारतीय संगीताच्या परंपरेतील एक जुने आणि महत्त्वाचे वाद्य असून, आधुनिक संगीताच्या बदलत्या ट्रेंडमध्येही त्याचे महत्त्व कायम आहे.

# गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड; पत्रकारांसाठी नवे उपक्रम आणि धोरणात्मक निर्णय जाहीर

## पत्रकारांनी निर्भय राहून समाजहितासाठी कार्य करावे–अशोक वानखेडे

**माळशिरस । श्रीकृष्ण देशपांडे**

लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी पार पाडताना पत्रकारांनी निर्भय आणि नि:पक्षपाती राहणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता सत्य आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून लोकशाही मजबूत करण्यासाठी पत्रकारांनी कार्य करावे, असे मत ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले. मुंबईत आयोजित विशेष कार्यक्रमात न्यूज १८ चे वरिष्ठ पत्रकार गोविंद वाकडे यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी राज्यभरातील पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर झाली. पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी नवे उपक्रम हाती घेण्याचा निर्धार नव्या कार्यकारिणीने व्यक्त केला.



नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पत्रकार आणि प्रशासन यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कार्यरत राहील. शासनाच्या विविध योजनांचे जिल्हानिहाय सर्वेक्षण करून त्यासंदर्भातील अहवाल प्रकाशित करण्यात येतील, जेणेकरून प्रशासन आणि जनता यांच्यात योग्य समन्वय साधता येईल. राज्यात पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांना आळा घालण्यासाठी पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीसाठी पश्चिम महाराष्ट्र विभागासाठी सचिन चपळगावकर आणि कोकण विभागासाठी नवनाथ कापले यांची नेमणूक करण्यात आली. महिला पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र हेल्पलाइन आणि सुरक्षा यंत्रणा उभारण्याचा प्रस्ताव पत्रकार संघटनेने मांडला आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील महिला पत्रकारांना अधिक संधी मिळाव्यात, यासाठी विशेष उपक्रम राबवले जाणार आहेत.संघटनेच्या बैठकीत पत्रकारांच्या विमा योजना, पेन्शन योजना आणि डिजिटल मीडिया पत्रकारांच्या मान्यतेसाठी विशेष धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. पत्रकारांचे हक्क अबाधित राहण्यासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शासन दरबारी ठोस मागण्या करेल, असे पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले. नूतन कार्यकारिणीच्या सत्कार सोहळ्यात पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी साईबाबांची मूर्ती, शाल, पुष्पगुच्छ, डायरी, बॅग आणि मिठाई देण्यात आली. विशेष म्हणजे, पारंपरिक खारीक-खोबऱ्याच्या हाराने सन्मान करून महाराष्ट्राच्या संस्कृतीशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार हेमंत जोशी, संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ऑल इंडिया जनरल महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रणधीर कांबळे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमणी, सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. पत्रकार संघाच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले ज्यात पत्रकारांसाठी कायदेशीर मदत केंद्र सुरू होणार,पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या घटनांमध्ये न्याय मिळावा, यासाठी पत्रकार कायदेशीर मदत केंद्र सुरू करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे.ग्रामीण भागातील पत्रकारांना प्रशिक्षित करण्यासाठी जिल्हानिहाय विशेष कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पत्रकार संरक्षण कायदा आणण्यासाठी सरकारवर दबावपत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र कायदा लागू करण्यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याचे ठरले आहे. पेन्शन आणि विमा योजना लागू करणे.पत्रकारांसाठी पेन्शन आणि विमा योजना सुरू करण्यासाठी सरकारकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

**पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारणीची यादी**

राष्ट्रीय अध्यक्ष: अशोक वानखेडे, संस्थापक अध्यक्ष: संजय भोकरे,प्रदेशाध्यक्ष: गोविंद वाकडे,कार्याध्यक्ष: निलेश सोमणी,प्रदेश उपाध्यक्ष: अशोक देडे, किशोर रायसाकडा, डॉ. अभय कुमार दांडगे, नितीन शिंदे, महेश पानसे इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रदेशाध्यक्ष: अतुल परदेशी,सोशल मीडिया प्रदेशाध्यक्ष: सिद्धार्थ भोकरे,पत्रकार हल्ला विरोधी समिती प्रमुख: किशोर पाटील,मंत्रालय संपर्क प्रमुख: नितीन जाधव,संघाचे प्रवक्ते: रमेश डोंगरेश्र विभागीय अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य: महाराष्ट्रभरातील जिल्हाध्यक्ष व मान्यवर पत्रकार

या सोहळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या नेतृत्वाने पत्रकारांसाठी सुरक्षाविषयक उपाययोजना, हक्कांसाठी लढा आणि पत्रकारितेच्या दर्जेदार भविष्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा निर्धार व्यक्त केला. हा कार्यक्रम महाराष्ट्रातील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या नव्या कार्यकारिणीने पत्रकारांसाठी नव्या संधी, सुरक्षितता, विमा योजना, प्रशिक्षण आणि कायदेशीर मदतीसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. हा निर्णय राज्यातील पत्रकारांसाठी नव्या युगाची सुरुवात ठरेल.

### पत्रकार संघटनांची एकजूट गरजेची–संजय भोकरे

**कार्यक्रमात बोलताना संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे यांनी सांगितले,पत्रकार संघटनांनी एकत्र येऊन सरकारवर दबाव वाढवला तरच पत्रकारांच्या हक्कांसाठी ठोस निर्णय घेतले जातील. पत्रकारांनी समाजहितासाठी निर्भय आणि नि:पक्षपाती भूमिका घेतली पाहिजे.**

### राज्य सरकारकडे पत्रकारांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करू – निलेश सोमानी

**प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी यांनी पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि कल्याणकारी योजनांसाठी राज्य सरकारकडे ठोस पाठपुरावा करण्याचा निर्धार व्यक्त केला.ते म्हणाले, पत्रकारांच्या सुरक्षा, विमा योजना, पेन्शन आणि अन्य मागण्यांसाठी संघटना सरकारदरबारी पाठपुरावा करेल. पत्रकारांना भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कायम त्यांच्या पाठीशी राहील.**

### पत्रकारांच्या हक्कांसाठी संघटना कटिबद्ध–डॉ.विश्वासराव आरोटे

**पत्रकार संघटनेच्या वतीने बोलताना डॉ. विश्वास आरोटे यांनी स्पष्ट केले की, पत्रकार सुरक्षेसाठी ठोस धोरण राबवावे, पेन्शन योजना लागू करावी आणि पत्रकारांसाठी विशेष विमा योजना आणावी यासाठी आम्ही सरकारकडे लवकरच ठोस मागणी करणार आहोत.**

# सिंगल मदर्स ग्रुपने दिला पारंपारिक प्रथांना तडा



**चिमूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सिंगल मदर्स ग्रुप तर्फे मोठ्या उत्साहात हळदीकुंकूचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम नांदेड येथे घेण्यात आला होता. जेथे पती गेल्यानंतर एका स्त्रीला समाजात दुय्यम वागणूक दिली जाते. विधवा महिलांनाच हळदी कुंकवाचा मान हिरावला गेलेला होता. अशा स्थितीत जुन्या परंपरातील उनीवा दूर करत एक नवी सुरुवात करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील जळवळपास २६ जिल्ह्यातून ३७ सिंगल मदर्स ने एकत्रित येऊन हळदीकुंकू चा कार्यक्रम उत्साहात पार पडला. ज्यामध्ये गोवा, कर्नाटक आणि सुरत येथूनही महिला सदस्य उपस्थित होत्या . या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्यातून पाच महिलांनी सहभाग नोंदविला होता.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रुती अशोक मोरे, डॉ चेतना कोतकर, मनीषा दिनेश पाठक आणि महिला बाल विकास एकल महिला समिती सदस्य शुभांगी जितेश रावते उपस्थित होत्या. सुप्रिया बाळासाहेब नरवडे आणि सोनाली माधव गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शवित कार्यक्रमाचे संचालन युक्ती निलेश चौहान प्रास्ताविक स्वप्ना भागेश कुलकर्णी आभार श्मंगल भास्कर कुलकर्णी आणि कुसुम हरिभाऊ डहाळे यांनी केले.

# किरण पाटील पगार व बाबासाहेब पाटील शिंदे यांना सामाजिक कार्यासाठी पुरस्कार जाहीर

**वैजापूर । प्रतिनिधी**



गोळवाडी गावातील माजी सरपंच किरण पाटील पगार आणि बाबासाहेब पाटील शिंदे यांना त्यांच्या समाजसेवेबद्दल ९ फेब्रुवारी रोजी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या दोन्ही नेत्यांनी गोळवाडी, रामनगर, मीरुकनगर, करंजगाव यांसारख्या गावांमध्ये समाजसेवेचा वृत्तच हाती घेतला आहे.किरण पाटील पगार आणि बाबासाहेब पाटील शिंदे यांनी गावांमध्ये विहिरी, शेततळे, गाय गोठा यांसारखी महत्त्वाची कामे मंजूर करून आणली आहेत. पंचायत समितीत जाऊन त्यांनी स्वखर्चाने विविध विकासकामे मंजूर केली आहेत. गावातील विधवा महिलांना पेन्शन योजना आणि वृद्ध महिलांना श्रावणबाळ योजना सुरू केली आहे. यामुळे काही महिलांना या योजनांचे फायदे मिळायला सुरुवात झाली आहे. गोळवाडी ते रामनगर रस्त्याचे १५ ते २० वर्षांपासून बंद पडलेले काम त्यांनी आमदार रमेश पाटील बोरणारे यांच्या मदतीने मंजूर करून आणले आहे. या रस्त्याच्या कामाला सध्या सुरुवात झाली आहे.गावातील ग्रामस्थांचे सर्व प्रकारच्या समस्यांचे निराकरण करणारे किरण पाटील पगार आणि बाबासाहेब पाटील शिंदे यांना त्यांच्या कार्याची दखल घेत ९ फेब्रुवारी रोजी पुरस्कार दिला जात आहे. पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या दोघांचे कौतुक केले आहे आणि पुढील कार्यकाळातही त्यांनी समाजसेवेसाठी कष्ट घेत राहावे, अशी सर्वांनी विनंती केली आहे.

# खासगी सावकारीचे फुटले पेव,दरमहा दहा ते पंधरा टक्क्यांनी कर्ज देण्याचा नवा धंदा

**शिरूर । रमेश बनसोडे**

सध्या शहर आणि ग्रामीण भागात अवैध सावकारीचा धंदा जोमात वाढला आहे. जमिनीच्या व्यवहारातून मिळालेल्या पैशांचा उपयोग व्यवसायवृद्धीसाठी करण्याऐवजी, अनेक व्यक्ती झटपट पैसे कमविण्याच्या नादात कर्ज देण्याच्या धंद्यात उतरल्या आहेत. या धंद्याला आता विशेषतः दहा ते तीस टक्के व्याज दराने कर्ज देणे हाच मुख्य आधार बनलेला आहे.



शहरात या सावकारीच्या जाळ्यात अनेक जण अडकले आहेत. एका ओळखीच्या व्यक्तीकडून पैसे घेतल्यावर त्याच्या व्याजाच्या बोजामुळे अनेक लोक जसे आहेत, तसेच तशाच कर्जाच्या फासात अडकले आहेत. सरकारी बँकांच्या कर्ज प्रक्रियेतील कठोर नियमांपेक्षा, खासगी सावकारांकडून सुलभ कर्ज मिळवणे अनेकांना अधिक सोयीचे वाटते.

सावकारीचा धंदा चालवण्यासाठी काही तथाकथित नेत्यांनी, व्यापाऱ्यांनी आणि बँका व पतसंस्थांचे बदनाम संचालकांनी या धंद्यात पैशांची गुंतवणूक सुरू केली आहे. त्यासाठी दोन-तीन टक्क्यांवर पैसे पुरवणारी नवी यंत्रणा तयार झाली आहे. हे लोक, कुठल्याही प्रकारचे कामधंदा न करता, अवैध सावकारीच्या माध्यमातून पैशांची वसुली करतात. विशेष म्हणजे काही लोक कागदोपत्री संरक्षण म्हणून सावकारीचे लायसन्स घेत आहेत, परंतु त्यांचा खरा व्यवसाय काही वेगळा असतो. कर्ज घेतलेल्या व्यक्तींना व्याजाची भेडसावणारी समस्या सोडवता येत नाही. अशा परिस्थितीत पोलिसांना कायदेशीर कारवाई करण्यास अनेक अडचणी येतात, कारण तक्रार न झाल्यास काहीही करणे शक्य होत नाही.

या सावकारीच्या धंद्यात अनेक बेरोजगार तरुण, शेतकरी, लहान व्यावसायिक आणि नोकरदारही अडकले आहेत. सुरुवातीला व्याज देणे शक्य असले तरी हळूहळू कर्जाचे बोजे वाढत जातात, आणि ग्राहक अधिकाधिक होरपळले जातात. यावर प्रतिबंध घालण्यासाठी पोलिसांनी आणखी कडक कारवाई करणे आवश्यक आहे, अन्यथा या अवैध सावकारीच्या जाळ्यात अजून अनेक लोक अडकणार आहेत.

# आयुध निर्माणी स्फोटात नरेंद्र वंजारी गंभीर जखमी

**भंडारा । प्रतिनिधी**

जवाहर नगर स्थित आयुध निर्माणीमध्ये २४ तारखेला झालेल्या भीषण स्फोटात ८ कर्मचारी मृत्यू झाले, तर ५ कर्मचारी जखमी झाले होते.. यामध्ये नरेंद्र प्रल्हाद वंजारी (५५) यांची अवस्था अत्यंत गंभीर असून त्यांना नागपूरच्या किंगवे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.



नरेंद्र वंजारी यांचे पायाची हाडे १४ तुकडे झालेली आहेत आणि डॉक्टरांनी सांगितले आहे की, त्यांना प्लास्टिक सर्जरीसह ३ ते ४ ऑपरेशन्स करावे लागतील. प्रत्येक ऑपरेशन २ महिन्यांच्या अंतराने केले जाईल. डॉक्टर संचिते यांनी स्पष्ट केले की, कोणत्याही प्रकारचा इन्फेक्शन होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जाणार आहे. स्किन डॅमेज झाली असल्यामुळे प्लास्टिक सर्जरी करावी लागेल आणि पायात रॉड टाकावे लागेल.हड्डी जोडण्याचा पर्यंत सुरु आहे.डॉक्टरांच्या मते, वंजारी यांना पूर्णपणे बरे होण्यासाठी जवळपास १ वर्ष लागण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर एक मोठा मानसिक आणि आर्थिक ताण आला आहे. आयुध निर्माणीमध्ये झालेल्या या वाईट घटनेने स्थानिक समुदायात चिंता आणि परिवार मध्ये शोकाची लाट पसरली आहे. सर्व संबंधितांनी वंजारी यांच्या जलद बरे होण्याची प्रार्थना केली आहे आणि या घटनेची गंभीरता लक्षात घेऊन सुरक्षा उपाययोजनांवर पुनर्विचार करण्याची गरज आहे.

# भविष्यात व्याघ्र जिल्ह्यांतील खेळाडू आंतर राष्ट्रीय हॉकी गाजविणार–आ.वडेट्टीवार

## ब्रम्हपुरी येथे राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचे थाटात उद्घाटन

**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

ग्रामीण खेळाडुंमध्ये जिद्द, चिकाटी यांसह प्रगल्भ ईच्छा शक्ती व प्रतिभा असतांनाही सुविधांच्या अभावांमुळे त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या खेळांचे प्रदर्शन करणे शक्य होत नाही. अशा खेळाडुंच्या स्वप्नांना पंख देण्याहेतू शिक्षणाची पंढरी असलेल्या ब्रम्हपुरी नगरीत ग्रामीण खेळाडूना आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान उपलब्ध करून देण्यासाठी शासना मार्फत कोट्यावधींचा निधी मंजूर करून दिला. याचा पुरेपूर लाभ घेऊन वाघांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या चंद्रपूर जिल्ह्यातील खेळाडूंनी भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर हॉकीसह अन्य स्पर्धांमध्ये इतिहास रचून आपल्या ब्रम्हपुरी क्षेत्राचे नावलौकिक करावे असे प्रतिपादन राज्याचे माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रह्मपुरी येथे हॉकी असोसिएशन द्वारा आयोजित राज्यस्तरीय हॉकी स्पर्धा आमदार चषक च्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.




आयोजित उद्घाटन सोहळ्यास अध्यक्ष म्हणून प्रा.सुभाष बजाज तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, जिल्हा काँग्रेस सचिव विलास विखार, तहसीलदार सतीश मासाळ, मुख्याधिकारी अर्शिया जुही, ठाणेदार प्रमोद बानबले, महाराष्ट्र हॉकी उपाध्यक्ष मनीषा आखरे, माजी नगरसेवक सागर आमले, वनपरिक्षेत्र अधिकारी धोंडणे, तालुका क्रिडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड, ईकबाल जेसानी, संजय पारटवार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, ब्रम्हपुरी तालुक्याला स्वातंत्र्यापूर्वीच्या काळापासूनच हॉकी खेळाचा वारसा लाभला आहे. आज ब्रह्मपुरी येथे आयोजित चार दिवसीय हॉकी स्पर्धेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या चमुंनी या स्पर्धेमध्ये सहभाग दर्शविला असून थेट मुंबईतून संघ येथे दाखल झाले आहेत. ही अभिमानाची बाब असून भविष्यात मैदानी खेळांकरिता येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार मैदानी तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देणार असून तत्पूर्वी त्या सरावांकरिता १२ कोटींचा विकास निधी येथील तालुका क्रीडा संकुलाला उपलब्ध करून दिला. भविष्यात ब्रह्मपुरी येथे हॉकी अकादमी सुरू करून येथील खेळाडू देश-विदेश स्तरावरील सामन्यांमध्ये सहभागी होऊन इतिहास रचणार व वाघांचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चंद्रपूर जिल्ह्यातील या ब्रह्मपुरीचे वाघ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये दर्जेदार कामगिरी बजावणार असेही ते म्हणाले. तर अध्यक्षीय भाषणात प्राध्यापक बजाज म्हणाले की, क्षेत्राचे लोकप्रतिनिधी नामदार विजय वडेट्टीवार यांचे आणि यशाचे फार जुने नाते असून त्यांनी आजवर केलेल्या प्रत्येक प्रयत्नाला भरघोस यश मिळाले आहे. भविष्यातही आमदार विजय वडेट्टीवार यांच्या मार्गदर्शन नक्की चालविलेल्या प्रयत्नांना देखिल येथील हाकी असोसिएशनला सुगीचे दिवस येतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सोबतच त्यांनी हॉकी खेळाचे प्रेरणास्थान मेजर ध्यानचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकत उपस्थित हाकी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूरज मेश्राम,प्रास्ताविक निनाद गडे यांनी केले.आभार प्रदर्शन मोंटु पिलारे यांनी केले. आयोजित कार्यक्रमास ब्रह्मपुरी हॉकी असोसिएशनचे सर्व सभासद, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# ब्रम्हपूरी येथील इंदिरा गांधी चौक सौंदर्यीकरणाचे लोकार्पण माजी मंत्री,आमदार विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती

**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

ब्रम्हपूरी विधानसभा क्षेत्राची धूरा हाती घेताच राज्याचे माजी विरोधी पक्षनेते, माजी मंत्री, आमदार विजय वडेट्टीवार यांनी शासनस्तरावरून कोट्यवधींचा विकास निधी खेचून आणत विकासकामांचा धडाका कायम ठेवत शिक्षणाची पंढरी म्हणून नावलौकिक असलेल्या ब्रम्हपूरी शहरात विविध शासकीय कार्यालयाच्या प्रशस्त इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून आता शहरातील वर्दळीचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौकाच्या सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते संपन्न झाले आहे.

ब्रम्हपूरी शहरातील ख्रिस्तानंद रुग्णालयाच्या समोरील प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौकाचे वैशिष्ट्यपुर्ण योजनेच्या ३६ लाख रुपयांच्या निधीतून सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. सदर काम हे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विशेष प्रयत्नांतुन मंजूर झाले होते. सदर विकासकाम पुर्णत्वास आल्याने त्याचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी बोलतांना आमदार विजय वडेट्टीवार यांनी सांगितले की, ब्रम्हपूरी शहरातील इतरही मुख्य चौकांचे सौंदर्यीकरण लवकरच करण्यात येणार असुन यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. विकसित, समृध्द व सुंदर शहर म्हणून ब्रम्हपूरीचे नावलौकिक व्हावे यासाठी मी कुठल्याही प्रकारची कसर सोडणार नाही असेही ते यावेळी म्हणाले.लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, जिल्हा काँग्रेस सचिव विलास विखार, शहर काँग्रेस अध्यक्ष हितेंद्र राऊत, माजी नगराध्यक्षा रिताताई उराडे, माजी नगरसेवक महेश भर्रे, माजी नगरसेवक सागर आमले, मनोज कावळे, शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, कृउबा संचालक किशोर राऊत, तहसीलदार सतीश मासाळ, पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले, मुख्याधिकारी अर्शिया जुही, स्थापत्य अभियंता अविनाश बंडावार, कार्यालय अधिक्षक मंगेश बोंद्रे, ईकबाल जेसानी यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# ओबीसी विद्यार्थ्यांचा मागील पाच महिन्यांपासून प्रलंबित मासिक निर्वाह व भोजन भत्ता घ्या!

## आमदार देवराव भोंगळे यांची बहुजन कल्याण मंत्री ना.अतुल सावेंकडे मागणी

**राजुरा । प्रतिनिधी**

ओबीसी आणि भटके विमुक्तांसाठी राज्य सरकारने ५२ वसतिगृहे सुरू केली परंतू मागील पाच महिन्यांपासून या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मासिक निर्वाह व भोजन भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांसाठीचा खर्च मिळाला नसल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे राज्य सरकारने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष घालून विद्यार्थ्यांचा मासिक निर्वाह व भोजन भत्ता डीबीटीद्वारे जमा करावा अशी मागणी राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री. देवराव भोंगळे यांनी राज्याचे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री ना. अतुलजी सावे यांना भ्रमणध्वनी करून केली.

ओबीसी, व्हीजेएनटी मुला-मुलींना शहरात उच्च शिक्षणासाठी वसतिगृहाची सोय नसल्याने भाड्याने खोली घेऊन राहावे लागत होते, अशावेळी त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहे निर्माण करण्याचा सकारात्मक निर्णय राज्य सरकारने घेतला आणि ऑगस्ट-सप्टेंबर २०२४ पासून ओबीसी मुला-मुलींसाठी राज्यात ५२ वसतिगृह सुरू करण्यात आली. विद्यार्थ्यांना दैनंदिन उपयोगाच्या खर्चासाठी मासिक ८०० रुपये निर्वाह भत्ता आणि खानावळीसाठी ४२०० रुपये भोजन भत्ता देण्याचे ठरले. विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम दर महिन्यात जमा होणे अपेक्षितही होते. परंतु सदर रक्कम मागील पाच महिन्यांपासून विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रचंड आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने तातडीने या गंभीर विषयाकडे लक्ष घालून ओबीसी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रलंबित मासिक निर्वाह व भोजन भत्ता तातडीने द्यावा. अशी मागणी आमदार श्री. देवराव भोंगळे यांनी भ्रमणध्वनी करून केली आहे.



# १ फेब्रुवारी रोजी जिल्हा ग्रंथोत्सवाचे आयोजन

## पालकमंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांची असणार उपस्थिती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण-२०१० अंतर्गत, उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत ग्रंथोत्सव उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याअनुषंगाने, चंद्रपूर ग्रंथोत्सव-२०२४ चे आयोजन दि. १ व २ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालय, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. सदर ग्रंथोत्सवाला आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांची उपस्थिती असणार आहे.

ग्रंथोत्सवाचा शुभारंभ शनिवार, दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता ग्रंथ पूजन व ग्रंथदिंडीने होणार आहे. ग्रंथोत्सवाच्या आयोजनानिमित्ताने ग्रंथ प्रदर्शन व विक्री तसेच विविध साहित्य कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये दुपारी ३ वाजता अभिजात मराठी भाषा व तिचे भवितव्य, तर २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता समाज माध्यमांचा वाढता प्रभाव व ग्रंथालयांची उपयोगिता या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून दुपारी २ ते ४ वाजता मराठी गझल मुशायरा सादर होणार आहे.

# पालकमंत्री अशोक उईके यांचा चंद्रपूर जिल्हा दौरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक



उईके हे १ फेब्रुवारी २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

१ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ११ वाजेपर्यंत शासकीय विश्रामगृह येथे राखीव, सकाळी ११ वाजता चांदा क्लब ग्राऊंड येथे जिल्हास्तरीय हिराई महोत्सव व मिनी सरस प्रदर्शनी - २०२५ या कार्यक्रमाला उपस्थिती, दुपारी १२ वाजता मान्यवरांसाठी राखीव, दुपारी २ वाजता नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती, दुपारी ४ वाजता स्थानिक कार्यक्रमांसाठी राखीव, सायंकाळी ५ वाजता वरोरा कडे प्रयाण, सायंकाळी ७ वाजता जुने कॉटन मार्केट ग्राऊंड वरोरा येथे सरपंच महोत्सवास उपस्थिती, रात्री ८.३० वाजता यवतमाळ कडे प्रयाण.

# ४१६.५८ कोटींच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

## नवीन कारागृह इमारतीच्या प्रस्तावाची सूचना



**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी शासनाने दिलेल्या २०७.२२ कोटींच्या वित्तीय मर्यादेत वाढ करून यंत्रणांनी २०९.३६ कोटींच्या वाढीव मागणीसह एकूण ४१६.५८ कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी जिल्ह्यासाठी नवीन कारागृह इमारतीचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिल्या.

राज्यस्तरीय समितीच्या आगामी बैठकीत जास्तीत जास्त वाढीव निधी मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.या बैठकीला खासदार अमर काळे, आमदार अभिजित वंजारी, सुधाकर अडबाले, समीर कुणावार, सुमित वानखेडे, राजेश बकाने, जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुराग जैन, उपवनसंरक्षक हरविर सिंग, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजूरवार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणासाठी सहकार्य करण्याचे आवाहन

**चंद्रपूर । प्रतिनिधी.**

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय साख्यिंकी कार्यालयाच्या धर्तीवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. सदर पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार आहे. या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश, शासकीय आणि खाजगी रुग्णालय, दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबाचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील आदी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे.सदर सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि मागील ३६५ दिवसांमध्ये रुणालयात दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती यामधून करण्यात येणार आहे. सर्वेक्षणाच्या निष्कर्षाचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे.त्याअनुषंगाने, माहिती संकलित करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना सखोल प्रशिक्षण देण्यासाठी नाशिक येथे कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या माध्यमातून क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले आहे. कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी फेब्रुवारी ते डिसेंबर २०२५ दरम्यान निवडलेल्या कुटुबांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील माहिती गोळा करतील.नमूना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजीत केले जातील. सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्यविषयक खर्चासबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटूंबीयांनी सहकार्य करण्याचे आवाहन अर्थ व सांख्यिकी विभागाचे आयुक्त तसेच अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संचालक यांनी केले आहे.

# मराठी भाषेचे जतन करण्याचा ध्यास घ्यावा-श्रीपाद प्रभाकर जोशी

## जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये भाषेचा उपयोग अनिवार्य असून भाषा ही संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. माहिती, ज्ञान, विचार, भावना यांची देवाणघेवाण भाषेच्या माध्यमातूनच करता येते. त्यामुळे मराठी भाषेचे जतन करण्याचा ध्यास सर्वांनी घ्यावा, असे प्रतिपादन श्रीपाद प्रभाकर जोशी यांनी केले.जिल्हा प्रशासन, जिल्हा माहिती कार्यालय व मराठी सिटी हायस्कुल,चंद्रपूरच्या संयुक्त विद्यमाने मराठी सिटी हायस्कुलच्या सभागृहात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) विशाल देशमुख, चांदा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अशोक पुल्लावार, मराठी सिटी हायस्कुलच्या मुख्याध्यापिका महानंदा थोरात, हिंदी सिटी हायस्कुलच्या मुख्याध्यापिका रोशनी वर्भे, मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पेदोंर, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी उपस्थित होते.




संतांनी मराठी भाषेला विकासाच्या प्रवाहात आणून ठेवले, असे सांगून श्रीपाद जोशी म्हणाले, मराठी भाषेला दोन हजार वर्षांपासूनचा इतिहास आहे. आपल्या भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. संत ज्ञानेश्वरांनी त्यांच्या कालखंडात मराठीची पायाभरणी केली. संत तुकाराम महाराजांनी अभंग रचून भरभराट केली. तर छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीला वैभव प्राप्त करून दिले. कवी कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला सन्मान मिळवून देण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. मुकुंदराजांनी विवेकसिंधू नावाचा मराठी भाषेतील पहिला ग्रंथ लिहिला तर श्री.चक्रधर स्वामींनी मराठी भाषेत 'लीळाचरित्र' हा ग्रंथ लिहिला होता. संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका, ज्ञानेश्वरी लिहिली. मराठीतून अनेक काव्यरचना केल्या. संत नामदेव, संत जनाबाई, संत चोखामेळा आदी संतांनी ओव्या व अभंगाच्या माध्यमातून मराठीचे महत्त्व रेखाटले असे ते म्हणाले. यावेळी श्री. जोशी यांनी विविध कविता संग्रह, साहित्य, अभंग, कालखंड, विविध क्षेत्रातील कवी, लेखक तसेच मराठी भाषेचा उगम ते इतिहास अधोरेखित केला.

उपशिक्षणाधिकारी विशाल देशमुख म्हणाले, आपल्या पूर्वजांकडून तयार केलेली भाषा अडीच हजार वर्षापासून सुरू आहे. एखाद्या भाषेचे जतन करण्यासाठी त्या भाषेचे ज्ञान असणं गरजेचं आहे. मराठी भाषेचे जतन व संवर्धन व्हावं हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचेही ते म्हणाले.प्रास्ताविकेत बोलताना जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर म्हणाले, शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा राबविण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी ही आपली मातृभाषा आहे. दैनंदिन व्यवहारात तसेच घरी देखील आपण मराठी भाषेचा वापर करतो. संवाद साधण्याचे उत्तम साधन भाषा आहे, असेही श्री. येसनकर म्हणाले.यावेळी चांदा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अशोक पुल्लावार, मराठी सिटी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका महानंदा थोरात यांनी आपले मत व्यक्त केले. तत्पूर्वी, कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभार सुशील सहारे यांनी मानले.

## आष्टी उपसा सिंचन योजना पुर्ण होण्याच्या आशा पल्लवित

# मा.आमदार राजन पाटील यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कडे सिंचन योजनेसाठी चालू अर्थसंकल्पात १०० कोटींच्या निधीची मागणी

**मोहोळ । प्रतिनिधी**

आष्टी उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक तीन साठी चालू आर्थिक वर्षाच्या बजेटमध्ये शंभर कोटी रुपयांच्या भरीव निधीची मागणी महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांच्या कडे केली आहे. याबाबत ना. पवार यांनी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित प्रशासनास दिल्याची माहिती माजी आमदार राजन पाटील यांनी दिली.

याबाबत बोलताना ना. पाटील म्हणाले, मोहोळ तालुक्याच्या उर्वरित हरितक्रांतीचा टप्पा पूर्ण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या आष्टी उपसा जलसिंचन योजनेसाठी यापूर्वी शासन स्तरावरून आम्ही शेकडो कोटींचा निधी मंजूर करून आणला आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या टप्पा क्रमांक तीन सह सर्व कामांसाठी आणखी ७३५ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. तसेच, या पूर्वीच आष्टी उपसा सिंचन योजनेतील तिसऱ्या टप्प्यातील उर्वरित कालवा, अन्य कामे आणि नव्याने समाविष्ट झालेल्या अनगर सह दहा गावांच्या सिंचन योजनेच्या सुधारित आराखड्यासाठी ३९५ कोटी ४८ लाख रुपयांच्या निधीची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याचे ना. राजन पाटील यांनी आवर्जून नमूद केले. येत्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी शंभर कोटी निधीची तरतूद झाल्यास त्याचा फायदा नव्याने निर्माण करण्यात येणारे पंप हाऊस आणि मेन लाईनच्या उभारणीला होणार आहे. गत विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने मोहोळ येथील दौऱ्यावर ना. अजित पवार आले असता, आपल्या प्रस्तावित भाषणातून लोकनेते शुगर चे चेअरमन बाळराजे पाटील यांनी या महत्वपूर्ण सिंचन योजनेसाठी भरीव निधीची मागणी व्यासपीठावरच सर्वांसमक्ष केली होती. त्यामुळे ना. अजित पवार यांनी या योजनेसाठी आवश्यक तो निधी देण्याचे आश्वासन सर्वांसमक्ष दिले होते.



## मांडूळ सापाची तस्करी, दोन आरोपींना अटक

**शिरूर । रमेश बनसोडे**

पुणे: शिरूर तालुक्यात मांडूळ सापाची तस्करी करताना दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. शिरूर पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार विजय शिंदे आणि त्यांच्या सहकारी पोलिसांनी शहरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला.

गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या अनुसार, शिरूर-रामलिंग रस्त्याच्या बाजूला गायरान जागेत दोन व्यक्ती पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट गाडीत मांडूळ जातीचा साप घेऊन उभे होते. पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि त्यानंतर सापळा रचण्यात आला. रामलिंग रोडवरील गायरानमधून घोटीमळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक पांढऱ्या रंगाची सुझुकी स्विफ्ट कार उभी होती. गाडीमध्ये देवदास इमराज भोसले (वय ५१, रा. मुखई) आणि धनेश्वर दुर्यभान भोसले (वय ३५, रा. गणेगांव खालसा) हे दोघे होते. त्यांच्या जवळ ४ फूट लांबीचा नर जातीचा मांडूळ साप सापडला.



पोलिसांनी दोघा आरोपींना ताब्यात घेतले असून, शिरूर पोलीस ठाण्यात वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले आणि पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे पथकाने केली. पथकात उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पो. हवा नाथसाहेब जगताप, पोलीस अंमलदार विजय शिंदे, नितेश थोरात, सचिन भोई, नीरज पिसाळ, निखिल रावडे आणि अजय पाटील यांचा समावेश होता.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खेळाडू व विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडांगणावरील असुविधांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रवक्ते नितेश कराळे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी व खेळाडूंनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.



जिल्हा स्टेडियमवरील सततच्या असुविधांमुळे खेळाडूंना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मैदानावर पाणी न मारल्यामुळे उडणारी धूळ खेळाडूंच्या सराव व आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने हा आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला.या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी व खेळाडूंनी सहभागी होऊन प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त केला. खेळाडूंनी आम्हाला स्वच्छ व सुरक्षित मैदान हवे अशी मागणी केली.प्रशासनाने तत्काळ समस्या सोडवण्याचे आश्वासन दिल्यास आंदोलन मागे घेण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

**समुद्रपूर । प्रतिनिधी**

यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा संचालित यशवंत विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मांडगाव आणि अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्था, बोथुडा यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात स्व. बापूरावजी देशमुख व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. उद्घाटन सुनिल डुकरे यांच्या हस्ते झाले, तर प्रास्ताविक राजेश बाळसराफ यांनी केले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार एसएससी परीक्षेत कु. रोहित डवरे (८१.४०%),कु. भाग्यश्री भारसाकडे (८४.२०%),कु. संजीवनी चांभारे (७४.२०%)एचएससी परीक्षेत कु. राणी गुळघाणे (६९%),कु. संकेत बरडे (७४%),कु. रागिणी काकडे (६४%) या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, मेडल व मोमेंटो देऊन सन्मान करण्यात आला.




प्रमुख अतिथी सुनिल डुकरे यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी भविष्यासाठी प्रेरणा दिली, तर रोशन नवघरे यांनी समाजाप्रती असलेल्या जबाबदारीवर भाष्य केले.


यावेळी निबंध, वक्तृत्व, क्रिकेट, संगीत खुर्ची, लंगडी, प्रश्नमंजुषा, नाटिका व नृत्य स्पर्धांमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. नेहरू युवा केंद्र, वर्धा यांच्या वतीने भाषण स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना मोमेंटो देऊन गौरवण्यात आले.कार्यक्रमात मुख्याध्यापक नितीन लोहकरे, अस्तित्व बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रोशन नवघरे, प्रमोद कुडमते, सुरज शेंडे, गजानन मस्के, संजय गलाडे, कामडी , शेंडे आणि बावणे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन मुते यांनी केले, तर आभार प्रदर्शन पंकज दांडेकर यांनी केले. विद्यार्थ्यांसह पालक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिष्यवृत्ती योजना

**वर्धा । प्रतिनिधी**

अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी महाराष्ट्र शासनाने परदेश शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे.

या योजनेअंतर्गत क्यूएस वर्ल्ड रँकिंगमधील पहिल्या २०० क्रमांकाच्या परदेशी शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी आणि पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे.उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमामुळे अनुसूचित जमातीतील विद्यार्थी जागतिक स्तरावर ज्ञानार्जन करून प्रगती करू शकतील, असा शासनाचा विश्वास आहे.या योजनेबाबत अधिक माहिती आणि अर्ज प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.




## यशवंत माध्यमिक कन्या शाळेत स्नेहसंमेलन पार पडले



**देवळी । प्रतिनिधी**

यशवंत माध्यमिक कन्या शाळा, देवळी येथे स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेच्या मुख्यध्यापिका सौ. गोरडे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली झाले, तर प्रमुख पाहुणे म्हणून राठोड सर, शिक्षक प्रतिनिधी वैद्य सर, आणि यशवंत प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. पुष्पा बिरे मॅडम उपस्थित होत्या. आ.दाआजी उपाख्य बापूरावजी देशमुख तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.


मुख्यध्यापिका सौ. गोरडे मॅडम यांनी प्रास्ताविक भाषण केले. सुधीर राठोड सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर गणेश वंदनेने सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी सुंदर अशी नृत्य सादर केली. पालकांनी व देवळीवासीयांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला.कार्यक्रमात परीक्षक म्हणून वर्षा कोडापे मॅडम आणि रोशना उईके मॅडम यांची नियुक्ती करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये एकलनृत्यामध्ये प्रथम क्रमांक कु. वैष्णवी पेंदाम आणि द्वितीय क्रमांक कु. भाग्यश्री साखरकर, तसेच समूह नृत्यामध्ये वर्ग पाचव्या 'लल्लाटी भंडार' या नृत्याला प्रथम क्रमांक, वर्ग सातव्या 'शेतकरी नृत्य' ला द्वितीय क्रमांक मिळाला. वर्ग नवव्या 'ऑल इज वेल' या नृत्याला प्रथम क्रमांक आणि द्वितीय क्रमांक 'देशभक्तीपर नृत्य' कडून मिळाला. विशेष बक्षीस कु. विधि धोंगडे आणि प्रोत्साहनपर बक्षीस वर्ग १० क यांना देण्यात आले.कार्यक्रमाला सर्व शिक्षक-शिक्षिकांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन सौ. वडतकर मॅडम यांनी केले, आणि आभार प्रदर्शन सुधीर राठोड सर यांनी मानले.

## दांडगांव येथे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन

### आज आणि उद्या दोन दिवसीय आयोजन

**मारेगांव (रोड) । प्रतिनिधी**

दांडगांव : राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात येणाऱ्या दांडगाव येथे आज शनिवार दिनांक १ फेब्रुवारीला विविध रचनात्मक व विधायक आणि धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. पहाटे चार वाजता श्री गुरुदेव सेवा मंडळ व विदेही सद्गुरु जगन्नाथ बाबा पदावली भजन मंडळ आणि समस्त दांडगांव ग्रामवासी ग्रामसफाई व परिसर स्वच्छता मोहीम राबवणार आहेत. त्यानंतर वंदनीय राष्ट्रसंतांच्या पुतळ्याचे अभंगस्नान व पूजन नथ्थुजी बोकडे यांच्या हस्ते होईल. यावेळी श्री गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ उपासक सुभाष भुसारी, देवस्थान कमिटीचे अध्यक्ष अनिल लांबट, कवडूजी लांबट, रमेश चिंचोलकर आणि समस्त दांडगांववासी यावेळेस उपस्थित राहतील. त्यानंतर पहाटे ५ वाजता सेवाधिकारी युवराज चिंचोलकर यांच्या शुभहस्ते घटस्थापना व अधिष्ठान पूजन होईल. यावेळी दांडगावच्या सरपंच भारती चिंचोलकर, ग्रामपंचायत सदस्य भारती बावणे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पंकज मत्ते आणि ग्रामवासी उपस्थित राहील. त्यानंतर ग्रामगीता प्रचारक धनराज धवस यांचे सामुदायिक ध्यान व चिंतन होईल. त्यानंतर विदेही सद्गुरू श्री जगन्नाथ बाबा पदावली भजन मंडळ दांडगाव यांच्या भजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात आला असून त्यावेळी दांडगाव येथील शाळेचे मुख्याध्यापक निखाते, शेख सर, शाळा सुधार समितीचे अध्यक्ष एकनाथ आसुटकर प्रामुख्याने उपस्थित असतील. त्यानंतर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होईल. दुपारी १ वाजता स्वागत व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. यावेळी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमचे सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे, वणी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय देरकर, यवतमाळ जिल्हा प्रचारक प्रमुख मारोतराव ठेंगणे, यवतमाळ जिल्हा महिला



सेवाधिकारी तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य विजयाताई दहेकर, यवतमाळ महिला बालकल्याण विभागाच्या माजी सभापती अरुणा खंडाळकर, वणी तालुका सेवाधिकारी दिलीप डाखरे, चंद्रपूर जिल्हा महिला प्रमुख चंद्रकला मत्ते, ग्रामगीताचार्य रमेश तवाडे, श्री गुरुदेव सेनेचे दिलीप भोयर, दांडगावचे सुपुत्र इंजिनियर राजू यादवराव बावणे (नागपूर), दैनिक सह्याद्रीचा राखणदार चे वरिष्ठ संपादक डॉ. यशवंत घुमे (भद्रावती), भेंडाळे साहेब (पांढरकवडा) प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

त्यानंतर ग्रामगीता प्रचारक गणेश हरिदास चांदेकर महाराज यांचे ग्रामगीता प्रबोधन होईल. दुसऱ्या दिवशी २ फेब्रुवारी रविवारला ग्रामसफाई व परिसर स्वच्छता, सामुदायिक ध्यान व चिंतन, रामधून व ग्रंथ दिंडी सोहळा, आणि दुपारी १२.३० वाजता हभप अरुण खंगार महाराज (खैरी) यांचे काल्याचे किर्तन होईल .महाआरती नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. या दोन दिवसीय कार्यक्रमाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन दांडेगाव येथील श्री गुरुदेव भजन सेवा मंडळ, श्री सद्गुरु जगन्नाथ बाबा पदावली भजन मंडळ, मंजुळा माता महिला भजन मंडळ, राजमाता जिजाऊ महिला भजन मंडळ, श्री छत्रपती शिवाजी महाराज समिती दांडगाव आणि समस्त दांडगाव ग्रामवासी यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी संभाजी ब्रिगेडची मागणी, बँक कपातीविरोधात निवेदन

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींना वाचा फोडण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका अध्यक्ष प्रवीण ढाले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी अनेक शेतकरी उपस्थित होते.

वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. अतिवृष्टी, पिकांना मिळणारा कमी भाव आणि अस्मानी संकटांमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच नैसर्गिक आपत्तीच्या मदतीसाठी मिळालेले पैसे बँकांनी कर्ज कपातीसाठी कापल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

संभाजी ब्रिगेडने बँकांनी तातडीने कपात केलेले नैसर्गिक आपत्तीचे पैसे शेतकऱ्यांना परत करण्याची मागणी केली आहे. तसेच ही मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही प्रवीण ढाले यांनी दिला.शेतकऱ्यांच्या या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

